**जनवाचन आंदोलन**
**बालपुस्तकमाला**

आवडणार नाही का तुम्हाला
पुस्तकांचं बोलणं ऐकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय
पुस्तकांमध्ये चिमण्या चिवचिवतात
पुस्तकांमध्ये हिरवी शेतं डुलतात
पुस्तकांत झऱ्यांचं पाणी गुणगुणतं
अन् पऱ्यांच्या कथा कुजबुजतात
पुस्तकांत अग्निबाणाचं रहस्य असतं
पुस्तकांत विज्ञान बोलत असतं
पुस्तकांचं जग केवढंतरी मोठं आहे
पुस्तकांमध्ये ज्ञानाची लयलूट आहे

आवडणार नाही का तुम्हाला
त्या जगात भटकायला?
पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

-सफदर हाश्मी

मूल्य रु. ६.००

भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय



# केर कचरा

लेखक लॉरी बेकर
हिन्दी अनुवाद अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद शोभा भागवत



भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

या प्रकाशनांचा उद्देश लोकांमध्ये आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणं हा आहे.

पुस्तकाचे नाव : केरकचरा
लेखक : लॉरी बेकर
हिन्दी अनुवाद : अरविंद गुप्ता
मराठी अनुवाद : शोभा भागवत
संपादन : विनया देशपांडे
चित्रकार : लॉरी बेकर
निर्मिती सहाय्यः दिनानाथ मनोहर

जवाआं ५० / बाल - ४


प्रकाशन : जून २००१

मूल्य : ६ रुपये

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ,
पुणे-४११०३०. फोन : ०२०-४४५६६९४
मुद्रणस्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे-४११००४.

अक्षर जुळणी : गणेश कांबळे




# केरकचरा

**लॉरी बेकर**

कचऱ्याची आणि घाणीची सुरूवात घरापासून होते.

लॉरी बेकर यांना हे जाणून घ्यायचंय की आपण या साऱ्या केरकचऱ्याचं काय करणार आहोत?



**केर कचरा - ओला आणि कोरडा!**

कोरडा कचरा म्हणजे निरूपयोगी, फेकून दिलेल्या वस्तू. कचरा म्हणजे कुजणारी, वास येणारी टाकून दिलेली घाण.

**कुठे मिळतो हा कचरा आपल्याला?**


रस्त्याच्या कडेला, गटारांच्या कडेला, दुकानांसमोर, बाजारात, सर्वांच्या घरासमोर.

**या कचऱ्यात काय काय असतं बरं?**

सर्व प्रकार ! त्यात प्लास्टिक बरंच मिळतं. कागद, जाड पुट्ठे, कापडाच्या चिंध्या, पानं, रानटी वनस्पती, छाटलेल्या फांद्या, जुने डबे, फुटक्या बाटल्या आणि कधी कधी मेलेली जनावरंपण.







**हा सगळा कचरा, ही घाण कुठून येते ?**

घरं, दुकानं, फेरीवाले, येणारे-जाणारे
लोक, तुम्ही आणि मी, आपण
सगळेच घाण निर्माण करतो.

**या कचऱ्याचं होतं तरी काय ?**

काही उन्हा-पावसामुळे कुजून जातो. काही कचरा कुत्री-मांजरं, उंदीर, बकऱ्या इकडे तिकडे पसरवतात.

कधी कधी कोणीतरी येऊन कचऱ्याला आग लावतो. हे सगळे लोक कचरा पसरवण्याचं काम करतात, कचरा नाहीसा करत नाहीत.

**या सगळ्यांबद्दल आपलं काय मत आहे ?**


याबाबत आपण काय विचार करता? 'त्यांनी' काहीतरी करायला हवं. कचऱ्याची समस्या मार्गी लावायला हवी. वर्षातून एखाद्या वेळी, लाखात एखादा माणूस कचऱ्याच्या प्रश्नाबद्दल एखाद्या वर्तमानपत्राच्या संपादकाला एखादं पत्र लिहितो.

**हा कचरा रस्त्यावरून उचलतात तेव्हा तो कुठे जातो?**

बहुतेक वेळा हा कचरा तिथेच राहतो आणि ढीग वाढत राहतो. कधी कधी 'गांधी जयंती'ला किंवा 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' कार्यक्रमात कचरा हलवला जातो !

हा कचरा आपल्या दृष्टिआड एखाद्या ठिकाणी नेतात. कचरा नेताना बराच इकडे तिकडे उडतो, सांडतो.

**आपण आपल्या घरातल्या कचऱ्याचं काय करतो ?**



हा कचरा खूप भरभर साठत जातो. जो ओला कचरा जाळता येत नाही तो आपण खड्ड्यात टाकतो. केळाच्या साली, अंड्यांची टरफलं अशा गोष्टी तर भिंतीपलीकडे फेकून देतो. आणि एकदा तर खत सुद्धा तयार करण्याचा प्रयत्न



केला! पण लवकरच लक्षात आलं की प्लास्टिकचं खत होत नाही! घरात कचऱ्याचा डबा आहे. पण तो लगेचच भरतो. तो कुठे टाकून यावं कळत नाही.

कावळे, मांजरं हा कचरा इकडे तिकडे पसरवत राहतात.

**आपण याबद्दल काहीतरी का करायचं ?**

कारण आपल्याला दुर्गंधी येते. घाण वास येतो. कचरा दिसायला वाईट दिसतो. कचऱ्यामुळे डास, माशा, मुंग्या येतात. त्यामुळे काही रोगपण होतात. मुलं खेळताना या घाणीमुळे कपडे, अंग मळवतात. काही वेळा आजारी पडतात.





**पण या कचऱ्याचं आपल्याला काही करता येईल का ?**


काय करता येईल? हा कचरा कुठे घेऊन जाता येईल? आपल्याला कचरा टाकायला कचराकुंडी किंवा उकिरडा मिळाला तरी तिथपर्यंत कचरा नेणं हे महापालिकेचंच काम आहे. त्यांनीच कचऱ्याच्या वाहतुकीचा प्रश्न सोडवला पाहिजे!

**मग ते या बाबतीत काहीतरी का करत नाहीत?**

**कोणतं प्रशासन? कोणती नगरपालिका?**

हो, तर ! कुठला तरी सरकारी विभाग असेलच ना या शहराचं नियंत्रण करणारा? महापौर असतील किंवा कलेक्टर. किंवा आणखी कोणी तरी.

**पण सरकारने का करावं हे घाण काम?**



हा कचरा निर्माण
कोणी केला ?
आम्ही.
आपल्यासाठी
प्लास्टिकच्या
पिशवीतून दूध
महापौरांनी तर
आणलं नाही.
कलेक्टरने तर
आमची केळी खाऊन
सालं रस्त्यावर
टाकली नाहीत ना ?



**प्रशासन याबाबतीत काही करू शकतं का ?**

छोट्या शहरांच्या नगरपालिकांकडे दोन चार ट्रक असतील, काही सफाई कर्मचारी असतील. त्यांना शक्य असेल तेवढा कचरा ते उचलतात आणि गावाबाहेर नेऊन टाकतात कुठंतरी. पण याला खूप खर्च येतो.

## रस्त्यावरचा कचरा

रस्त्याच्याकडेला
खूप कचरा पडलेला
असतो. त्याची
जबाबदारी कोणीही घेत
नाही. 'मी काही तो
कचरा टाकलेला नाही.
मग मी का काही करू
त्याचं ?'



जागोजागी पडलेले
कचऱ्याचे ढीग साफ
करणं फार कटकटीचं
काम आहे. खूपवेळा
या उकिरड्याचा लोक
'सार्वजनिक
शौचालया'सारखा
उपयोग करतात.

## कारखान्यांमधून येणारा कचरा

कारखान्यांचा कचरा वेगळा असतो. तो कधी विषारी वायू हवेत फेकला जातो तेव्हा दिसतो, किंवा नदीत विषारी रसायनं सोडली जातात तेव्हा दिसतो.

खरं तर कारखान्यांनी आपल्या कचऱ्याची वासलात स्वतःच लावायला हवी.

परंतु तरीही मूळ प्रश्न अजून कायमच आहे. कारखान्यांनी आपला कचरा कुठे टाकायचा ?


आपण हुषार आहात. या प्रश्नाचं उत्तरही आपल्याजवळ असेल.

जर समाजसेवक म्हणून या कारखान्याच्या विषारी कचऱ्याचं तुम्हाला काही करावंसं वाटलं, तर कारखान्याच्या लोखंडी गेटपाशी उभे असलेली सुरक्षा व्यवस्थापक, वॉचमन तुम्हाला आत सोडतील?

कारखान्यांबद्दल बोलताना एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. आपल्या नद्या म्हणजे सांडपाण्याची गटारं नाहीत किंवा कचराकुंड्याही नाहीत. सर्वांना बिर्लांच्या ग्रासिम किंवा झुआरी कारखान्याविषयी माहीत असेल. विषारी








रसायनं स्वच्छ नदी-नाल्यात सोडणारे! आणखी असे किती कारखाने आहेत कोण जाणे! ते आपलं किती नुकसान करत असतील याचा पत्ताच नाही लागणार!


आणखी एक गोष्ट मला आठवते आहे. जवळच एक शहर आहे. ते मोठं पर्यटन केंद्र बनलं आहे. तिथे प्रवाशांना माहिती देण्यासाठी एक ऑफिस उघडलं आहे. तिथे जवळच 'प्रसाधनगृह' आहे. कोणी पर्यटक वापर करतो आणि फ्लश खेचतो तेव्हा ती घाण नदीत जाऊन पडते. तिथेच इतर पर्यटक आनंदानं नौका विहार करत असतात! काय छान दृश्य आहे नाही?

## या समस्यांबद्दल आपण काय करावं ?

एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेऊया - या सगळ्या प्रश्नांची उत्तरं शोधणं एकट्या सरकारचं किंवा नगरपालिकेचं काम नाही. त्यांनी काही करायला हवं हे मान्य. पण याचा अर्थ आपण हात बांधून वाट बघत बसायचं असा नाही. कुणातरी अधिकाऱ्याला-प्रशासकाला या वाढत्या समस्येची काही जबाबदारी सांभाळावी लागेल हे तर खरंच. पण त्याचबरोबर आपल्याला सर्वांना मिळून या समस्येवर परिणामकारक आणि कायमचा उपाय शोधण्यासाठी काम करावं लागणार आहे.





**यासाठी आपण काय काय करूया?**

(१) सर्व परिस्थिती प्रथम समजून घेऊया. मग समस्यांचा अभ्यास करूया. शेवटी यावरचा उपाय शोधूया. उत्तर शोधूया.

(२) सर्व लोकांची मदत घेऊया. सर्वांच्या विचारांची, सूचनांची नोंद घेऊया.

(३) शक्य झालं आणि गरज वाटली तर काही प्रयोग करू या.

(४) आपण स्वतः आणि आपले कुटुंबीय हा कचऱ्याचा ढीग कसा कमी करू शकू हे पाहूया.

(५) दुकानदार, दुधाचे,सिमेंटचे तसेच मिठाईचे उत्पादक, असे सगळेजण कचरा कमी करण्यासाठी काय करू शकतील तेही पाहूया.

(६) आजकाल आपण काहीही खरेदी केलं तरी त्याच्याबरोबर केवढं पॅकिंग असतं ! हाही प्रश्न समजून त्यावर काही उपाय शोधूया.

(७) सरकारकडे मागणी करूया की कचऱ्याचा प्रश्न सुटावा यासाठी त्यांनी जमीन देऊ करावी.

## काही उपाय आहेत

प्लास्टिकचा कचरा मोठा कठीण प्रश्न आहे. त्याची विल्हेवाट लावणं कठीण आहे. प्लास्टिक तुम्ही जाळू शकता पण त्यामुळे फार प्रदूषण होईल. हवं तर तुम्ही प्लास्टिक पुन्हा वापरू शकाल, री-सायकल करून. पण त्यात आणखी ऊर्जा खर्च होईल. तसा प्लास्टिक एक उपयोगी पदार्थ आहे. पण बहुतेक वेळा प्लास्टिक जमिनीतून काढलेल्या (खनिज) तेलापासून तयार होतं. हे तेल भारतात फार कमी मिळतं. आपल्याला परदेशातून दरवर्षी हजारो कोट्यावधी रुपयांचं तेल खरेदी करावं लागतं. प्लास्टिकच्या उत्पादनात खूप ऊर्जा खर्च होते आणि आपल्या देशात ऊर्जाही कमी उपलब्ध आहे.



एवढं सगळं असेल तर मग प्लॅस्टिक जास्त कशाला वापरायचं? आपल्याबरोबर नेहमी एक कापडी किंवा कागदी पिशवी ठेवा. बाजारात एक किलो







बटाटे आणि अर्धा किलो टॉमॅटो घेतले तर ते वेगवेगळ्या प्लास्टिक पिशव्यातून घेण्याची जरूर असते का ?

प्लास्टिकच्या विनाकारण वापराला आपण लगाम घालायला हवा. हे आधी आपण स्वतः करायला लागूया. नंतर दुकानदार, फेरीवाले यांना या त्रासाबद्दल समजावून सांगू आणि त्यांनीपण प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर कमी करावा यासाठी प्रयत्न करू.

## एक उपाय?

एखादी गोष्ट आपल्याला पॅक करायची असली तर ती कागदात किंवा कापडात गुंडाळूया. या दोन्ही गोष्टी भरपूर प्रमाणात मिळतात. हवं तर यांचं उत्पादन वाढवताही येईल. कागदाचा पुन्हा लगदा करून पुन्हा कागद बनवता येतो. त्यात फार ऊर्जाही खर्च होत नाही. याप्रकारे काम केलं तर एकीकडे कचरा कमी होईल आणि खूप लोकांना कामही मिळेल.

## कुजणाऱ्या पदार्थांपासून खत



कुजणाऱ्या वस्तू वेगळ्या ठेवायला हव्यात. भाज्यांची सालं, देठं, चहाचा चोथा, फळांच्या साली, बिया हे सगळं यात आलं. आपल्याजवळ एक चौरस मीटर जमीन असली तर आपण या कचऱ्यापासून खत बनवू शकाल. हे छानपैकी खत आपल्याला बागेत, कुंड्यांमध्ये घालता येईल. आपल्याला भाज्या, फळं, फुलं लावता येतील.

खरं तर घरातून जो कचरा बाहेर फेकला जातो. त्यात कुजणाऱ्या कचऱ्याचं प्रमाण सर्वात जास्त असतं. या पदार्थांचं खत करून आपल्याला आपला खाद्यपदार्थांवरचा खर्च कमी करता येईल. आपणच लावलेल्या भाज्या, फळं खाण्याचा आनंदही मिळेल.

आपल्या घरात जेवढा जुना कागद असेल, उदा. वर्तमानपत्रं, मासिकं, शक्य तर हे सगळं सपाट करून ठेवा. रद्दीवाल्याला ते



विकता येईल. रद्दीवाल्याला सांगितलं तर तो नेमाने येऊन रद्दी घेऊन जाईल.




अशाच प्रकारे पत्र्याचे डबे, बाटल्या, काचा, प्लास्टिकच्या बाटल्या, लोखंड, टूथपेस्टच्या जुन्या ट्यूब्ज, ॲल्युमिनियमचा पत्रा, जुनी भांडी, सगळं भंगारवाल्याला विकता येईल.

भंगारवाला हे सगळं कारखान्यांना विकेल आणि हे धातू वितळवून पुन्हा त्याच्या नवीन वस्तू बनतील. याप्रमाणे तुमच्या घरातला कचराही खूप कमी होईल.

कचरा भट्टीत जाळून टाकावा असं बरेच जण सांगतात. पण त्यापासून अनेक प्रकारे नुकसान होतं.

उदाहरणार्थ,

(१) हवा प्रदूषित होते.



(२) कधी कधी भट्टया इतक्या काठोकाठ भरतात की त्यात कचरा जळतच नाही.

(३) अनेकदा भट्टीत न जळणारा कचरा भरला जातो मग भट्टी जाम होते.

(४) भट्टीची क्षमता कमी असते, तिच्यात थोडासाच कचरा मावतो.

(५) लोक भट्टीत ओले पदार्थही टाकतात. त्याने जळणाला अडथळा येतो.


(६) ज्या गोष्टी जाळून टाकाव्यात असं आपल्याला वाटतं, त्या परत योग्य प्रकारे वापरता आल्या तर त्यात अधिक फायदा आहे. भट्टीचा थोडासा फायदा आहे, पण तसा उपयोग फार कमी आहे.

**घरातच ओला आणि कोरडा कचरा वेगळा करणं**


'तुम्ही खत बनवा, री-सायकल करा, वगैरे हे जे शिकवता आहात ते ठीक आहे पण मी फार कामात असतो, मला रिकामा वेळच नाही.'

जवळपासच्या लोकांना गट करून ओला-कोरडा कचरा वेगळा करता येईल. प्रत्येक घरात किंवा दुकानात सिमेंटच्या पोत्यासारख्या मोठ्या कागदी पिशव्या ठेवता येतील. याप्रकारच्या कागदी पिशव्या मिळाल्या नाहीत तर सिमेंटची जुनी प्लास्टिकची पोती वापरता येतील. ही पोती चार वेगवेगळ्या रंगांची ठेवता येतील. एका पोत्यात कुजणारे पदार्थ, दुसऱ्यात धातू, तिसऱ्यात काच, चौथ्यात जुनं प्लास्टिक वगैरे टाकता येईल.

भंगारवाला ही सगळी पोती एखाद्या दिवशी वेळेच्या सोयीप्रमाणे घेऊन जाऊ शकतो. तो हे सामान पुन्हा विकेल आणि विकत घेणारे लोक ते वितळवून नवीन माल बनवतील. काही ठिकाणी कचरा एकत्र गोळा करणं हाच मोठा प्रश्न असतो. यावर पुढे विचार करूया.



कचरा गोळा करण्याच्या बाबतीत आपल्याला एक




महत्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी. कचरा गोळा करणं, वेगळा ठेवणं याचं आपण आपल्या स्वतःच्या घरचंच उदाहरण घालून द्यायला हवं. आपल्या मुलांनाही आपण काही चांगल्या सवयी शिकवल्या पाहिजेत.

उदाहरणार्थ,

(१) कमीत कमी कचरा निर्माण करा. (२) कोरडा आणि ओला कचरा वेगळा करा. तो वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये ठेवा. (३) शिक्षकांनीही मुलांना या बाबतीत जागृत करायला हवं. (४) कचरा इकडे तिकडे न टाकता योग्य कचराकुंडीत टाका.

कचरा निर्माण करणारे आणखी काही लोक आहेत. त्यांना आपण मदत करायला हवी. दुकानदार आणि फेरीवाले हे ते लोक.





काही वेळा आपली नगरपालिका, तिचे अधिकारी दुकान चालवायची परवानगी देतात. पण तिथे शौचालय नसतं, कचरा वेगळा ठेवायची सोय नसते. असं ते का करतात त्यांनाच ठाऊक ! काही दुकानात तर पाण्याचीही सोय नसते.



या लोकांना आपण कदाचित मदत करू शकू. यासाठी आपल्याला वजनाने हलके, सहज उचलून इकडे तिकडे नेता येतील असे मोठे डबे करून या दुकानांजवळ ठेवावे लागतील. हे डबे किंवा कचरा कुंड्या टिकाऊ असाव्यात यासाठी त्या फायबर ग्लासच्या बनवता येतील. ठराविक वेळाने या कचरा कुंड्या रिकाम्या करता येतील.



याच प्रकारे बाजारात फेरीवाले किंवा छोटे दुकानदार यांच्यासाठी पण काहीतरी करण्याची गरज आहे. काही शहरांमध्ये मोठ्या रस्त्यांच्या कडेला भेळपुरीवाले, पाणीपुरीवाले यांच्या गाड्या असतात अशा ठिकाणी कायमच्या फायबर ग्लासच्या कचराकुंड्या ठेवायला हव्यात. या कुंड्या ठेवणं आणि वेळेवर साफ करणं ही जबाबदारी नगरपालिकेचीच आहे.

जर या फेरीवाल्यांनी कचराकुंडीचा योग्य वापर केला नाही, आणि कचरा इकडे तिकडे टाकला तर त्यांना दंड करण्याचा कायदा करायला हवा. आणि नगरपालिकेच्या लोकांनी कचराकुंड्यांची सफाई नियमितपणे केली नाही तर त्यांनाही दंड व्हायला हवा.




**या सर्व सूचनांच्या संबंधात तीन मुख्य प्रश्न आहेत :**

(१) याबाबतीत कोण निर्णय घेईल आणि या योजनांचा खर्च कोण करेल?

(२) कोण नियमितपणे कचऱ्याची सफाई करेल आणि कचराकुंड्या स्वच्छ ठेवेल ?

(३) आणि हा सगळा कचरा नंतर कुठे नेला जाईल?

(कचराकुंड्यांमधून हा दुर्गंधी कचरा डंपयार्ड किंवा री-सायकलिंग डेपोपर्यंत कसा वाहून नेला जाईल ?)




## कचराकुंड्यांच्या संदर्भात काही विशेष गोष्टी

(१) कचराकुंड्या मजबूत असाव्यात. लवकर खराब होऊ नयेत. लवकर तुटू नयेत.

(२) दुरूनही त्या ठळकपणे दिसाव्यात. शोधण्यात वेळ जाऊ नये.


(३) दिसायला सुंदर असाव्यात. कचऱ्याच्या ढिगासारख्या दिसणाऱ्या नसाव्यात.

(४) काही कचराकुंड्या कायमच्या असाव्यात. त्यांना वेळोवेळी उचलून नेलं जावं आणि त्यांच्या जागी नव्या कुंड्या ठेवता याव्यात. या कुंड्या उचलायला हलक्या असाव्यात.



(५) काही ठिकाणी वेगवेगळ्या रंगांचे डबे ठेवावेत म्हणजे त्यात प्लास्टिक, काच, पत्रा, कुजणारा ओला कचरा असं वेगवेगळं टाकता येईल.





कचरा वेगवेगळ्या ठिकाणांहून उचलून कचरा डेपोपर्यंत नेण्यासाठी काहीतरी वाहनाचा उपयोग करावा लागेल. शहरापासून डंपयार्ड किती लांब आहे यावर वाहन कोणतं वापरायचं ते ठरेल. बराचसा कचरा मोठ्या रस्त्यांवरून येत नाही तर छोट्या गल्ली बोळातून येतो. मोठा ट्रक किंवा लॉरी केवळ कचऱ्याच्या काही ठिकाणांपर्यंतच पोचू शकेल. मग गल्ल्या-बोळातून कचरा मोठ्या रस्त्यापर्यंत डोक्यावरून वाहून आणायचा का? ते प्रशस्त नाही. या कामासाठी एकतर सायकल रिक्षा असतात तसा तीन चाकवाला टेम्पो वापरता येईल किंवा रिक्षाचा उपयोग होईल. सायकल रिक्षा किंवा ऑटो-रिक्शा गल्ली बोळात सहज ये-जा करू शकतात.

## सायकल रिक्षा आणि ट्रक

ट्रकपेक्षा सायकल रिक्षेतून कचरा नेण्यात बरेच फायदे आहेत -

(१) एका ट्रकच्या किमतीत २०० सायकल रिक्षा येतात.

(२) सायकल रिक्षाला इंधन लागत नाही.

(३) सायकल रिक्षांनी हवेचे प्रदूषण होत नाही.


(४) ध्वनि-प्रदूषणही होत नाही.

(५) सायकल रिक्षा जवळ जवळ कुठेही जाऊ शकतात.

(६) सायकल रिक्षांचा देखभालीचा, मोडतोडीचा, दुरूस्तीचा खर्चही कमी आहे.


(७) सायकल रिक्षांमुळे बऱ्याच अशिक्षित लोकांना रोजगार मिळेल.

(८) कचरा कुंड्या सायकल रिक्षात ठेवायच्या असतील तेव्हा त्यांना फार उंच उचलावं लागणार नाही.





## कचरा वाहून नेण्यासाठी आणखी काही साधनं



शहरापासून कचराडेपो किती दूर आहे यावरच वाहनाचा प्रकार अवलंबून आहे. छोट्या रस्त्यांवरून सगळा कचरा सायकल रिक्षांनी मोठ्या रस्त्यांवर आणावा आणि तिथून तो मोठ्या ट्रकमधून डंपयार्डला किंवा री-सायकलिंग कारखान्यांमधे न्यावा. हे कारखाने किंवा डंपयार्ड बहुतेक वेळा शहरापासून दूरच असतात.

तिथपर्यंत कचरा न्यायचा तरी खूप ऊर्जा खर्च होते. मेहनत खूप लागते. कचरा ट्रकने डंपयार्डला नेण्याऐवजी रोप-वेचाही विचार करता येईल. रोप-वे मधे ताणलेल्या जाड तारांवरून ट्रॉली सरळ डंपयार्डपर्यंत जाऊ शकते. रोप वे धान्याच्या शेतांवरून नेता येईल.

# मुख्य डंपयार्ड किंवा कचराडेपो



शेवटी जिथे सगळा कचरा जमा होतो ते हे ठिकाण. शहराबाहेर कचरा पुरण्यासाठी जमीन मिळणार नाही तोवर ही योजना पूर्ण होणार नाही. अशा प्रकारची जागा शोधणं आणि ती डंपयार्डला देणं हे काम सरकारचं किंवा नगरपालिकेचंच आहे. या कचऱ्याचा मोठा दुर्गंधीयुक्त डोंगर होऊ नये एवढीच आपली इच्छा ! याच्या आसपास काही सोयी हव्यात -

(१) कुजणाऱ्या ओल्या कचऱ्याचं खत करता यावं.

(२) कागद, काच, प्लास्टिक, पत्रा यांना वेगळं करून री-सायकल करून पुन्हा वस्तू बनवल्या जाव्यात.




(३) मेलेल्या जनावरांना पुरण्याची व प्रक्रिया करण्याची सोय असावी.

कचऱ्याच्या बाबतीत एवढी चर्चा करण्याची काय गरज आहे ? आपली जीवन शैलीच अशी होते आहे की आपण निर्माण केलेल्या कचऱ्याचेच आपण बळी होतो आहोत. जर शहरांमधला कचरा आपलं राजकारण आणि लोकसंख्या यांच्या वेगाने वाढत गेला तर आपल्याला सतत दुर्गंधीत रहावं लागेल, आजारपणं येतील, आरोग्य धोक्यात येईल. आपली आधुनिक जीवनशैली आपलं पूर्णपणे वाटोळं करेल आणि आपल्याला जीवही गमवावा लागेल. तसं काय, आपण आपले कपडे आणि शरीरही चोळून चोळून धुतोच की ! मात्र आसपासचे कचऱ्याचे ढीग पाहून आपण कधीच दचकत नाही. पण, आपण सगळ्यांनी प्रयत्न करूया आणि कचरा योग्य जागी टाकूया.



आपण सर्वजण नवनव्या सणांच्या-उत्सवांच्या स्वागताची विविध प्रकारे तयारी करतो आहोत. नवं वर्ष असो वा सार्वजनिक सण. तेव्हा मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा दुकानं, मांडव, झेंडे लागतील, रंगीत झाडं, दिव्यांच्या माळा लागतील, फटाके फुटतील. यांनी काही फायदा होवो न होवो, पण कचऱ्याचे ढीग मात्र नक्कीच निर्माण होतील. काही दिवस जल्लोष केल्यानंतर झेंडे आणि माळा उतरवल्या जातील. पण काय राहील असं तुम्हाला वाटतं ? कचऱ्याचे ढीग कोण उचलेल?






कचऱ्याची समस्या सरकार सोडवेल असं मला वाटत नाही. काही स्वयंसेवी संस्था चांगल्या आहेत. त्या निरक्षरांना, विशेषतः महिलांना, काही रोजगाराचं प्रशिक्षण देतात. यातून बेकार लोकांना रोजगार मिळतो आणि कचऱ्याचं खत तयार होतं, इतर वस्तू तयार होतात. यातून देश अधिक स्वस्थ आणि सुंदर होईल.

पूर्वीच्या काळी मेहतर व भंगी असत. ते सफाईचं काम करत. आपण आता ही मानसिकता बदलून स्वतःच कचरा एकत्र केला पाहिजे. नंतर त्याची प्लास्टिक, कागद, पत्रा, काच, कुजणारा ओला कचरा अशी विभागणी करून री-सायकलिंग करायला पाहिजे. या पुस्तकाला हवं तर **बेकरचा कचरा** म्हणा - ते नाव उपयोगी आहे. मला आशा वाटते आहे की यामुळे कचऱ्याकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलेल. एका बाजूने आपण कमी कचरा निर्माण करू आणि आलेल्या कचऱ्याची योग्य ती व्यवस्था लावू. मला असंही वाटतं की सरकार आणि स्वयंसेवी संस्था दोघंही याबाबतीत निश्चित पावलं उचलतील आणि हे नवं सहस्रक ''कचरामुक्त'' सहस्रक ठरेल.

**लॉरी बेकर**

शेवटी मला असं वाटतं की ही सर्व योजना एका समूहाचा प्रकल्प व्हावी.

ही योजना एखाद्या भागातल्या सर्व लोकांसाठी व्हायला हवी.

त्याचा फायदाही त्या सर्वांना मिळावा.

हा प्रकल्प साकार करण्यासाठी सर्व लोकांची मान्यता हवी आणि मदतही हवी.


सर्वांना या प्रकल्पाची काळजी वाटली पाहिजे आणि तो यशस्वी व्हावा यासाठी प्रत्येकाने काम केलं पाहिजे.

तरच ही योजना सफल होईल.





## कचऱ्याचं जीवनमान चिरंजीव हो !



आजच्या उपभोगवादी संस्कृतीची एकच घोषणा आहे - ‘खरेदी करा, आणि फेकून द्या.’ यामुळे एकीकडे कचऱ्याचे, घाणीचे ढीग वाढतायत तर दुसरीकडे पर्यावरणात विष कालवलं जातं आहे. आपण ठरवलं तर या परिस्थितीतून बाहेर पडू शकतो. पण त्याची सुरूवात आपल्याला स्वतःपासून करावी लागेल. आपल्याच घरापासून...